


# लोकशिक्षणातून रोगनिर्मूलन

LEAP
LEPROSY
ELIMINATION
ACTION
PROGRAMME

‘लीप’ कुष्ठरोग दूरीकरण कृती कार्यक्रम

Changing lives
ALERT-INDIA
since 1978

# ॲलर्ट-इंडिया

## कुष्ठरोग शिक्षण, उपचार व पुनर्वसन संस्था

ॲलर्ट-इंडिया (ALERT-INDIA) ही स्वयंसेवी संस्था, आपल्या कुष्ठरोग दूरीकरण कृती कार्यक्रम म्हणजे 'लीप' (LEAP: Leprosy Elimination Action Programme) अंतर्गत कुष्ठरोग दूरीकरणासाठी समाजातील विविध घटकांच्या सहभागावर आधारित कार्यक्रम राबविते व प्रोत्साहन देते.

- **विशेष निवडक मोहीमेतून** समाजामध्ये कुष्ठरोग विषयक जनजागृतीसाठी व प्राथमिक अवस्थेतील कुष्ठरुग्ण शोधण्यासाठीचे कार्यक्रम राबविते.
- **कुष्ठरोग संदर्भ सेवा केंद्राच्या** (एल.आर.सी. - लेप्रसी रेफरल सेंटर) माध्यमातून कुष्ठरोग बाधित व्यक्तींना सर्वसमावेशक आणि दर्जेदार सेवा उपलब्ध करून देते व सहाय्य करते.
- **निरंतर वैद्यकिय प्रशिक्षण** कार्यक्रमातून सर्वसामान्य आरोग्य सेवेतील आरोग्य कर्मचारी, सामाजिक आरोग्य सेवक, स्वयंसेवक यांना कुष्ठरोगाबद्दलचे ज्ञान व कौशल्य वाढविण्यासाठी प्रशिक्षण देते. तसेच वैद्यकिय व्यावसायिकांना कुष्ठरोगाविषयीची अद्यावत माहिती व ज्ञान देते.

कुष्ठरोग कार्यक्रमात समाजातील विविध घटकांचा सक्रिय सहभाग हेच 'लीप'चे मूलभूत आधार तत्व आहे.

**ALERT - INDIA**
Association for Leprosy Education, Rehabilitation & Treatment - India
B-9, Mira Mansion, Sion (W), Mumbai - 400 022.
Ph.: 2403 3081-2, 2407 2558
e-mail: info@alertindia.org | www.alertindia.org

**Inclusive Livelihood for Empowerment and Dignity (ILED) Project in Palghar District, Maharashtra**

*Supported by :*

HSBC
HONGKONG AND SHANGHAI BANKING CORPORATION

**LEAP Publications, since October, 2004**

*Reprint - 2,000 copies, Jan. 2026*

# कुष्ठरोगाबाबत गैरसमज व भीती का?

## कारण.....

१. कुष्ठरोग मानवास माहित असलेला सर्वात पुरातन रोग आहे. त्याची माहिती व उल्लेख बऱ्याचशा धर्मग्रंथात, सुश्रुत, चरक यांचे औषधोपचार ग्रंथात, मनुस्मृतीतील कायदे व नंतरचे कायदे यांच्या मध्ये मिळतात. म्हणूनच त्या आधारे अस्तित्वात आलेली व्यवस्था, ह्या सर्वांचा आधार हा **त्या त्या वेळचे ज्ञान व समजुतींवर आधारीत आहे.**

२. कुष्ठरोगामुळे येणारी व **दिवसेंदिवस अधिकाधिक वाढत जाणारी विकृती व विद्रूपता.** परिणामी, अशा व्यक्तीचे जिवंतपणी सामाजिक अस्तित्वाचे मरण आणि भोग समाजाने शतकानुशतके बघितले व अनुभवले. यामध्ये आजही पूर्णपणे बदल झालेला नाही. का ?

३. कुष्ठरोग हा जंतूंमुळे होणारा रोग आहे हेच मुळी आपणांस इ. स. १८७३ पर्यंत माहिती नव्हते. **आजही बऱ्याच लोकांना कुष्ठरोग हा जंतूंमुळे होणारा रोग आहे हे माहित नाही.** त्यामुळे समाजामध्ये आजही कुष्ठरोगाचे कारण व प्रसाराबाबत निरनिराळे समज व गैरसमज रुढ आहेत.

४. कुष्ठरोगावर **इ. स. १९४८ पर्यंत कुठलेही प्रभावी औषध उपलब्ध नव्हते,** त्यामुळे हा एक असाध्य रोग म्हणून समजण्यात आला. इ. स. १९८० मध्ये एम.डी.टी. (मल्टी ड्रग थेरपी) ह्या अत्यंत प्रभावी, परिणामकारक व आधुनिक बहुविध औषधोपचारामुळे कुष्ठरोगाच्या स्थितीत महत्त्वपूर्ण बदल झाले.

# दिसतं तसं नसतं.....!




**हाताची विकृती,** कुष्ठरोग मुक्त, पूर्णपणे बरी झालेली व्यक्ती



**तेलकट, लालसर त्वचा,** पण सर्वसामान्य दिसणारी कुष्ठबाधित व्यक्ती

**कुष्ठरोग म्हणजे विकृती व विद्रूपता नव्हे! महारोग ही नव्हे! कुष्ठरोगाबाबत गैरसमज व भीती ही केवळ स्वत:च्या व इतरांच्या बचावासाठी रूढ झाली.**


१. कुष्ठरोग्याची सांसर्गिकता केवळ डोळ्यांनी बघून ठरविता येत नाही.

२. कुष्ठरोग्याची सांसर्गिकता ही त्याच्या शरीरातील कुष्ठजतूंच्या प्रमाणावर अवलंबून असते, दृश्य स्वरूपाच्या (दिसणाऱ्या) विकृती व विद्रूपतेवर नव्हे!

# कुष्ठरोगाचे कारण

**कुष्ठरोग हा कुष्ठजंतूमुळे (मायको बॅक्टेरिअम लेप्रे) होणारा सांसर्गिक रोग आहे. म्हणूनच.....**





Yawalkar, 2001

कुष्ठजंतू *(Mycobacterium Leprae)* एम. लेप्रे सूक्ष्मदर्शक यंत्राखाली लाल काड्यांसारखे दिसतात.



डॉ. आरमर हॅन्सन यांनी कुष्ठजंतू इ.स.१८७३ मध्ये नार्वे येथे शोधला.

१. कुष्ठरोग कुणालाही होऊ शकतो.

२. कुष्ठरोग अनुवंशिक नाही.

३. पाप-पुण्याचा कुठलाही संबंध नाही.

४. पूजा-अर्चा, नवस फेडणे, जडीबुटी, मंत्र-तंत्र हा उपाय नाही.

**कुष्ठरोगाचे कारण कुष्ठजंतू हे आहे, म्हणूनच बहुविध औषधोपचार (एम.डी.टी.) हाच कुष्ठरोगावर खात्रीचा, आधुनिक आणि अत्यंत प्रभावी उपचार आहे.**

## कुष्ठजंतू:

१. कुष्ठरोगाच्या जंतूंचा प्रजनन कालावधी हा १५ ते २० दिवस इतका दीर्घ असतो. म्हणूनच अधिशयन काळसुद्धा ३ ते ५ वर्षे इतका दीर्घ असतो.

२. कुष्ठरोगाचे जंतू मुख्यत्त्वे चेतातंतू व त्वचा यावर आघात करतात. म्हणूनच कुष्ठरोगाची लक्षणे ही प्रामुख्याने चेतातंतू व त्वचेवर दिसतात.

३. कुष्ठरोगाची शारीरिक लक्षणे व चिन्हे यावरून रुग्णाची सांसर्गिकता ठरविता किंवा ओळखता येत नाही. केवळ जंतू परिक्षणानेच रुग्णाची सांसर्गिकता कळू शकते.

**कुष्ठरोग मुळीच स्पर्शजन्य (स्पर्शामुळे होणारा) रोग नाही, सहजा सहजी होणारा रोग नाही.**

# कुष्ठरोगाचा प्रसार



● सांसर्गिक रोग्याच्या शिंकण्यातून, खोकल्यातून व श्वासोच्छ्वासातून कुष्ठरोगाचे जंतू हवेत/वातावरणात पसरतात.

**उपचार न घेतलेल्या सांसर्गिक कुष्ठरोग्याकडूनच कुष्ठरोगाच्या जंतूंचा प्रसार केवळ हवेच्या माध्यमातूनच होतो.**

१. श्वासोच्छ्वासाच्या प्रक्रियेत श्वसन मार्गातून कुष्ठरोगाचे जंतू शरीरात प्रवेश करतात.

२. कुष्ठरोगाचा अधिशयन काळ हा कुष्ठजंतूंचा संसर्ग (जंतूंचा शरीरात प्रवेश) झाल्यापासून ते कुष्ठरोगाची लक्षणे शरीरावर दिसू लागेपर्यंतचा काळ जवळपास ३-५ वर्षे इतका आहे.

३. औषधोपचाराखालील (बहुविध औषधोपचार - एम.डी.टी.) सांसर्गिक रोगी अल्पावधितच असांसर्गिक होतात. म्हणूनच, औषधोपचाराखालील व औषधोपचार (एम.डी.टी.) पूर्ण झालेले कुठलेच रोगी कुष्ठरोगाचा प्रसार करीत नाहीत.

## कुष्ठरोगाचे सांसर्गिक व असांसर्गिक असे दोन प्रकार आहेत.

१. म्हणजेच सर्वच कुष्ठरुग्ण सांसर्गिक (रोग प्रसार करणारे) नसतात.


२. कुष्ठरोगाचे फक्त १० ते १५ टक्के रोगीच सांसर्गिक असतात.

३. कुष्ठरोगाची शारीरिक लक्षणे व चिन्हे यावरून उपचारासाठी ढोबळपणे **मल्टी बॅसिलरी** [Multi-bacillary (MB)] व **पॉसी बॅसिलरी** [Pauci-bacillary (PB)] या दोन गटात विभागणी केली जाते.

४. कुठल्याही प्रकारचा कुष्ठरुग्ण बहुविध औषधोपचार सुरू केल्या दिवसापासून रोग प्रसार करू शकत नाही. म्हणजेच असांसर्गिक तर होतोच शिवाय पूर्ण उपचाराने रोगमुक्तही होतो.

**सर्व सांसर्गिक रोगांमध्ये कुष्ठरोग सर्वांत कमी सांसर्गिक रोग आहे. कुष्ठरोगाच्या तुलनेत टी.बी. (क्षयरोग), सामान्य सर्दी-खोकला, गोवर तथा कांजण्या हे आजार हे कितीतरी अधिक पटीने जास्त सांसर्गिक आहेत.**

# कुष्ठरोग कुणाला होऊ शकतो?



**आपल्यामधील १०० व्यक्तींपैकी फक्त २ व्यक्तींनाच (२%) कुष्ठरोग होऊ शकतो.**

१. ज्याप्रमाणे प्रत्येकाचे शरीर वेगळे असते, त्याचप्रमाणे प्रत्येकाची निरनिराळ्या रोगांविरुद्ध लढण्याची रोगप्रतिकार शक्ती ही सुद्धा वेगवेगळी असते. म्हणूनच एकाच कुटुंबातील सगळ्या व्यक्ती, एकाचवेळी, एकाच रोगाने आजारी पडत नाहीत.

२. वेगवेगळ्या रोगापासून बचावासाठी वेगवेगळ्या प्रतिबंधक लसी असतात पण, कुष्ठरोगाबद्दलची रोगप्रतिकारशक्ती वाढविण्यासाठी, बचावासाठी कुठलीही प्रतिबंधक लस नाही (No vaccine). कुष्ठरोगाबद्दलच्या लक्षणांची माहिती व औषधोपचार हाच सर्वोत्तम बचाव होय, सुरक्षित उपाय होय.

**म्हणूनच.....**

- स्वत:स सहज ओळखता येणाऱ्या कुष्ठरोगाच्या सुरुवातीच्या लक्षणांची माहिती करून घेवून इतरांनाही करून द्या.
- कुष्ठरोगाची शंका असल्यास लवकर निदान व पूर्ण औषधोपाचार करा.

**कुष्ठरोगाविरुद्धच्या नैसर्गिक रोगप्रतिकार शक्तिमुळे आपल्यापैकी ९८% लोकांना कुष्ठरोग होवूच शकत नाही.**

**कुष्ठरोग होणे किंवा न होणे हे त्या व्यक्तीच्या कुष्ठरोगाविरुद्धच्या रोगप्रतिकार शक्तिवरच अवलंबून असते.**

**लवकर निदान व नियमित उपचाराने कुष्ठरोगातील विकृती व विकलांगता निश्चित टाळता येतात.**

# कुष्ठरोगाची शास्त्रीय माहिती हाच सर्वोत्तम बचाव !



लोकशिक्षण हीच कुष्ठरोग निर्मूलनाची गुरूकिल्ली होय.

## कुष्ठरोग प्रसार व रोग नियंत्रणाची साखळी

| | |
|---|---|
| **कुष्ठरोगाचे सांसर्गिक रुग्ण** – | औषधोपचाराखाली नसलेले सांसर्गिक रुग्ण. |
| ↓ **हवेद्वारे कुष्ठजंतूंचा प्रसार** – | सांसर्गिक रोग्याच्या शिंकण्यातून, खोकण्यातून, श्वासोच्छ्वासाद्वारे. |
| ↓ **जनसामान्यांना कुष्ठजंतूंचा संसर्ग** – | कुष्ठरोग कोणालाही होऊ शकतो. |
| ↓ **रोग प्रतिकार शक्तिमुळे ९८% लोकांचा कुष्ठरोगापासून बचाव** – | कुष्ठरोग प्रतिबंधक लस नाही. म्हणून कुष्ठरोगाच्या लक्षणांची माहिती करून घेणे. |
| ↓ **केवळ २% लोकांनाच कुष्ठरोग होण्याची शक्यता** – | कुष्ठरोग होवू शकणाऱ्या व्यक्ती ओळखणे शक्य नाही. |
| ↓ **कुष्ठरोग झालेल्या व्यक्ती** – | स्वत:हून रोग तपासणी व रोग निदान करून घेणे. |
| ↙ **८५ ते ९०% असांसर्गिक** ↘ **१० ते १५% सांसर्गिक** – | सांसर्गिक कुष्ठरोगीसुद्धा औषधोपचाराने असांसर्गिक होतो. |
| ↘ ↙ **बहुविध औषधोपचार - एम.डी.टी.** – | केवळ सहा ते बारा महिन्यांत औषधोपचार पूर्ण होतो. |
| ↓ **कुष्ठरोग मुक्ती व रोग प्रसारास आळा** – | उपचारानंतर कुष्ठबाधित व्यक्ती ही तुमच्या आमच्यासारखीच सर्वसामान्य निरोगी व्यक्ती होय. |

**औषधोपचार पूर्ण झालेल्या कुष्ठबाधित व्यक्तिस 'कुष्ठरोगी' संबोधणे हा सामाजिक अपराध होय.**

# कुष्ठरोगाची लक्षणे

१. **त्वचेच्या रंगरूपात, पोतात होणारे बदल:** तेलकट, लालसर, सुजलेली व गुळगुळीत त्वचा म्हणजेच त्वचेच्या पोतातील बदल. जसे, जाड झालेल्या कानांच्या पाळ्या, अंगावरील गाठी इत्यादी.



तेलकट, सुजलेली व गुळगुळीत त्वचा



तेलकट, लालसर त्वचा, जाड झालेली कानाची पाळी



तेलकट, सुजलेली व गुळगुळीत त्वचा



अंगावरील गाठी

२. **चेतातंतू बाधित झाल्याने होणारे संभाव्य परिणाम:** चेतातंतू बाधित झाल्यावर चेतातंतूच्या संबंधित भागावर परिणाम होतात. त्यामुळे बाधित अवयवाची काळजी व बचाव करणे कठीण होते.



हातातील सुन्नपणामुळे वारंवार होणाऱ्या जखमा / इजा



पायातील सुन्नपणा व कोरडेपणामुळे पडलेल्या भेगा व जखमा



पापणीच्या लकवाग्रस्त स्नायूमुळे डोळा बंद न करता येणे



हाताच्या लकवाग्रस्त स्नायूमुळे वाकडी झालेली बोटे

**चेतातंतू बाधित झाल्याने होणारे संभाव्य परिणाम:**

- संबंधित भागात सुन्नपणा (बधिरता)येतो. घाम न आल्याने त्वचेला कोरडेपणा येतो व भेगा पडतात.
- स्नायूंत अशक्तपणा येवून ते नीट कार्य करू शकत नाहीत.
- अशा अवयवांना वारंवार इजा / जखमा होण्याची शक्यता जास्त असते.
- परिणामी चेहरा, हात व पायामध्ये विकृती येवू शकते.

३. **अंगावरील डाग:** अंगावरील त्वचेच्या रंगापेक्षा फिक्कट, लालसर कुठलाही डाग/चट्टा.



हातावरील लालसर, उंचावलेला डाग/चट्टा



अंगावरील लालसर, उंचावलेले डाग



अंगावरील अस्पष्ट डाग



अंगावरील अस्पष्ट डाग

**कुष्ठरोगाची सुरूवात एक किंवा अनेक डाग/चट्ट्यांनी होऊ शकते.**

## कुष्ठरोगाच्या लक्षणांची काही वैशिष्ट्ये:

१. लक्षणांच्या संख्येत, आकारात वाढ फारच मंदगतीने/ हळूहळू होते. म्हणून तातडीने उपाय केले जात नाही. चट्टा/डाग एकदम वाढत नाही त्यामुळे लक्षात येत नाही.

२. शरीरावर कुठेही येऊ शकतात त्यामुळे पाठीवरील किंवा कपड्यांनी झाकल्या जाणाऱ्या जागेवरील लक्षणे लक्षात येत नाही, दुर्लक्षली जातात किंवा लपविली जातात.

३. कुष्ठरोगाचे डाग दूधासारख्या पांढऱ्या रंगाचे नसतात. असे डाग त्वचेला रंग देणाऱ्या मेलॅनीन ह्या रंगद्रव्याच्या कमतरतेमुळे व अभावामुळे येतात. ज्याला 'कोड' (Vitiligo / Leucoderma) असे म्हणतात. याचा कुष्ठरोगाशी कुठलाही संबंध नाही. हा एक विकार आहे, म्हणूनच एका पासून दुसऱ्यास होत नाही.

४. कमी कालावधीत येऊन जाणारे डाग कुष्ठरोगाचे नसतात.

**कुष्ठरोग म्हणजे विकृती व विद्रूपता ह्या समजामुळे सुरुवातीच्या लक्षणांचा कुष्ठरोगाची लक्षणे म्हणून स्वीकार होत नाही किंवा सामाजिक भीतीपोटी लपविली जातात, गुप्त ठेवण्याचे प्रयत्न केले जातात.**

# कुष्ठरोगाचे निदान

**शारीरिक तपासणी करून कुष्ठरोगाचे निदान अगदीच सहज सोप्या पध्द्तीने करता येते.**



**१. संवेदना तपासून:**

कुष्ठरोगाच्या डागावरील / बाधित भागावरील संवेदना तपासून बहुतांश रुग्णांत कुष्ठरोगाचे निदान सहजतेने करता येते.




**२. चेतातंतू तपासून:**

काही रुग्णांत बाधित चेतातंतू व संबंधित भागातील संवेदना आणि स्नायुंची कमजोरी तपासूनही कुष्ठरोगाचे निदान करता येते.




**३. त्वचा विलेपन तपासून:**

फारच थोड्या रुग्णांत जेव्हा वरील पैकी दोन्ही बाबी आढळत नाहीत, पण त्वचेच्या पोतातील बदल (तेलकट, लालसर, जाडसर त्वचा), तसेच शरीरावर भरपूर डाग आहेत पण संवेदना सामान्य आहे. अशा रुग्णांत त्वचाविलेपन नमुन्याची प्रयोग शाळेत सूक्ष्मदर्शक यंत्राद्वारे कुष्ठजंतूसाठी तपासणी करून निदान करता येते.

**कुष्ठरोगाचे मोफत निदान व औषधोपचार सर्व सरकारी आणि निमसरकारी दवाखाने, त्याच प्रमाणे स्वयंसेवी संस्थांच्या (कुष्ठरोग) संदर्भ सेवा केंद्रांत होतो.**

# कुष्ठरोगात विकृती का?


**कुष्ठरोगातील विकृती ह्या मुख्यत्वे चेतातंतू बाधित होवून त्यांचे कार्य खंडित झाल्यानेच येतात.**




**कुष्ठरोगात बाधित होणारे मुख्य चेतातंतू**

*WHO, 92847*

## कुष्ठरोगामुळे बाधित चेतातंतूच्या संबंधित भागातील संवेदना जाते, त्वचा कोरडी होते व स्नायू अशक्त / लकवाग्रस्त होतात.




*WHO, 92848*

### चेतातंतूचे कार्य

| अवयव | सामान्य स्थिती | बाधित स्थिती |
|---|---|---|
| त्वचा | सामान्य संवेदनशील त्वचा. | संबंधित भागातील संवेदना जाते (सुन्नपणा). |
| घामाच्या ग्रंथी | घाम येतो, ओलसर त्वचा. | घाम न येणे, त्वचा कोरडी होते. |
| स्नायू | कार्यरत स्नायू, सांध्यात सामान्य हालचाल. | स्नायू अशक्त / लकवाग्रस्त होतात. मर्यादित हालचाल |

**कुष्ठरोगात चेतातंतूचे बाधित झालेले कार्य औषधोपचाराने पूर्ववत होणे कठीण असते. एकूण कुष्ठबाधितात केवळ १ ते २ % व्यक्तींनाच दृश्य स्वरूपाची विकृती असू शकते.**

# कुष्ठरोगातील विकृती.....

**कुष्ठरोग्याच्या सांसर्गिकतेचा (रोगप्रसाराचा) दृश्य विकृती व विद्रूपतेशी कुठलाच संबंध नाही.**

**कारण.....**

१. सर्वसामान्य दिसणारी कुष्ठबाधित व्यक्ती ही अत्यंत सांसर्गिक कुष्ठरुग्ण असू शकते.

२. सांसर्गिकता रोग्याच्या शरीरातील कुष्ठजंतूंच्या प्रमाणावर/संख्येवर अवलंबून असते तर विकृती आणि विद्रूपता ह्या मुख्यत्वे चेतातंतू बाधित होऊन अवयवांवरील संबंधित परिणामांवर अवलंबून असतात.

३. कुष्ठरोगाच्या विकृती व विद्रूपता असलेली व्यक्ती ही कुष्ठरोगातून पूर्णपणे बरी झालेली असू शकते.

४. कुष्ठरोगाविरुद्धची प्रतिकारशक्ती सांसर्गिक प्रकारच्या रुग्णांत अजिबात नसते किंवा अत्यल्प असते त्यामुळे शरीराचे व अवयवांचे नुकसान कमी होते व हळूहळू होते, दृष्य विकृती फार उशीराने येतात. या उलट असांसर्गिक प्रकारच्या रुग्णांत उत्तम रोगप्रतिकार शक्तीमुळे चेतातंतूंचे जास्त नुकसान होवून लवकरच दृश्य विकृती येण्याची शक्यता जास्त असते.

५. ज्याप्रमाणे एखादी जखम झाली असता ती पूर्णपणे बरी झाल्यावर सुद्धा व्रण / निशाणी मागे राहते. अपघातात एखादा अवयव तुटला, निकामी झाला असता उपचाराने तो पूर्ववत होत नाही. तसेच उपचारानंतर कुष्ठरोगामुळे आलेले काही डाग राहून जातात. विकृती सुन्नपणा / बधिरतेसह कायम रहातात म्हणूनच त्यांची निरंतर विशेष काळजी घ्यावी लागते.

**बहुविध औषधोपचाराने कुष्ठरोगाचे जंतू मारले जातात म्हणजेच रोग पूर्णपणे बरा होतो.**



**विकृती व विद्रूपता यामुळे कुष्ठरोग हा महारोग, झड्यारोग, रगतपीती, झुज़ाम, पापरोग, भिकाऱ्यांचा रोग म्हणूनही ओळखला जातो.**
**पण.....**

१. एकूण कुष्ठरूग्णांपैकी १-२ % व्यक्तींना विकृती असू शकते.

२. लवकर निदान आणि नियमित औषधोपचाराने येवू घातलेली विकृती हमखास टाळता येते.

३. बहुविध औषधोपचाराने कुष्ठरोग पूर्णपणे बरा होतो, पण विकृती पूर्ववत होत नाही. उशीरा झालेले निदान, अनियमित उपचार व इतर कारणांनी आलेल्या विकृतीस स्वयंदेखभालीने व भौतिकोपचाराने निश्चितपणे मर्यादा घालता येतात.

४. बहुविध औषधोपचाराखालील आणि उपचार पूर्ण झालेली कुठलीच व्यक्ती रोग प्रसार करत नाही.

**विकृती म्हणजे रोगाच्या अस्तित्वाचे, सांसर्गितेचे लक्षण नव्हे, रोगप्रसाराचे कारण व माध्यमही नव्हे.**

**औषधोपचार घेतलेले कुष्ठबाधित भिकारी,
त्याचप्रमाणे विकृती व विद्रूपता असलेल्या व्यक्ति ह्या रोगप्रसार करीत नाहीत.**

# कुष्ठरोगाचा उपचार

## स्वयंदेखभाल व भौतिकोपचार

**निरंतर स्वयंदेखभालीने विकृतीस प्रतिबंध केल्याने...**

- अवयव अधिक कार्यक्षम राहतात...
- जीवनाची आत्मविश्वासपूर्ण वाटचाल सहज करता येते...

**बधिर व लकवाग्रस्त अवयवांची स्वयंदेखभाल व काळजी म्हणजेच...**

- त्यांना इजा होऊ न देता त्यांचा योग्य वापर...
- जखम झाल्यास ताबडतोब उपचार / मलमपट्टी करणे.

**कुष्ठबाधिताची कुठलीही जखम** आराम दिल्यास (अवयवांची कमीत कमी हालचाल व दबावमुक्त केल्यास), स्वच्छ ठेवल्यास (जंतू संसर्ग होऊ नये म्हणून मलम व औषध लावल्यास), झाकून ठेवल्यास (जखमेत घाण जाऊ नये व माश्या बसू नये म्हणून पट्टी बांधून झाकून ठेवल्यास) **निश्चित बरी होते.**



- **लालसरपणा, सूज, जखमा व इजा यासाठी बाधित डोळा, हात, पाय यांची दररोज तपासणी.**










- सुन्न, बधिर हातपाय दररोज १५ ते २० मिनिटे पाण्यामध्ये बुडवून तेलाने मालीश,व्यायाम, स्प्लिंट्स व आवश्यक भौतिकोपचार करणे.
- सुन्न, बधिर पायासाठी एम.सी.आर. चप्पलांचा नियमित वापर करणे.


## बहुविध औषधोपचार (एम.डी.टी.)



**औषधोपचारापूर्वी**



**औषधोपचारानंतर**





### कुष्ठबाधित अजूनही कुष्ठाश्रमात व वसाहतीत का?

### सामाजिक तिरस्कार व घृणा का?

कुष्ठाश्रमात किंवा कुष्ठ वसाहतीत राहणारे कुणीही कुष्ठरोगी नाहीत. कारण, बहुविध औषधोपचाराने कुठल्याही स्थितीतील कुष्ठरोग ६ ते १२ महिन्यात पूर्णपणे बरा होतो. म्हणूनच अशा व्यक्तींना कुष्ठरोगी म्हणून संबोधणे, कुष्ठरोगी मानणे कदापी योग्य नाही. हे एकप्रकारे मानवी हक्काचे उल्लंघन व सामाजिक अपराधच होय.

**त्यांना त्यांच्या कुटुंबात व समाजात त्यांचे सर्वसामान्य स्थान द्या.**


**कुष्ठरोग हा एक पूर्णपणे बरा होणारा सर्वसाधारण रोग आहे.**

# बहुविध औषधोपचार (एम.डी.टी.)

## MDT आधुनिक औषधोपचार


| | |
|---|---|
| १ | **पॉसी-बॅसिलरी (पीबी) कुष्ठरोग**<br>Pauci-bacillary (PB) Leprosy<br>**६ महिने औषधोपचार** |
| २ | **मल्टी-बॅसिलरी (एमबी) कुष्ठरोग**<br>Multi-bacillary (MB) Leprosy<br>**१२ महिने औषधोपचार** |

प्रौढांसाठी



WHO/CDS/CPE/CEE/2000.14

मुलांसाठी



WHO/CDS/CPE/CEE/2000.14

**मार्च २०२५ पर्यंतची बहुविध औषधोपचार पद्धती**



बहुविध औषधोपचारात **रिफाम्पिसीन** - जंतूंना मारणारे परिणामकारक औषध, **क्लोफाझिमीन** व **डॅप्सोन** यासारख्या प्रभावी आणि गुणकारी औषधांचा वापर केला जातो. म्हणूनच, ही औषधे नियमित व पूर्ण कालावधीसाठी घेणे अत्यंत आवश्यक आहे.

**बहुविध औषधोपचार - Multi-drug Therapy (MDT)**

१. एम.डी.टी. औषधांच्या एकाच मात्रेने ९९.९९ % रोगजंतू मारले जातात. म्हणूनच सांसर्गिक रुग्णसुद्धा रोगप्रसार करू शकत नाही. कुष्ठरोग पूर्णपणे बरा होण्यासाठी नियमित व पूर्ण औषधोपचार करणे अत्यंत गरजेचे व बंधनकारक आहे.

२. कुठल्याही प्रकारचा कुष्ठरोग फक्त ६ ते १२ महिन्यांत पूर्णपणे बरा होतो.

३. एम.डी.टी. सर्वांसाठी सुरक्षित आहे. स्त्रीच्या गरोदरपणात, त्याच प्रमाणे इतर आजारांच्या उपचारासोबतही ही औषधे घेता येतात. अपवादात्मक स्थिती जसे :- पंडुरोग, मूत्रपिंड व यकृताचे आजार आणि विशिष्ठ औषधांची प्रतिक्रिया (Drug allergy) याची डॉक्टरांना कल्पना देणे गरजेचे आहे.

४. औषधोपचार पूर्ण झाल्यावरसुद्धा काही व्यक्तींमध्ये -
   - काही डाग, व्रणाच्या स्वरूपात मागे राहू शकतात.
   - सुन्नपणा / बधिरता पूर्णपणे नाहीशी होईलच असे नाही.
   - विकृतीची बधिरतेमुळे निरंतर काळजी घ्यावी लागते.

   अशा स्वरूपाच्या लक्षणांसाठी परत औषधोपचार घेण्याची गरजही नाही व त्यासाठी दुसऱ्या कुठल्या उपचाराने फायदा होत नाही.

- उपचारानंतर मागे राहून गेलेल्या विकृतीचा स्वीकार करून भौतिकोपचार आणि स्वयंदेखभालीने आवश्यक काळजी घेणे हाच सर्वोत्तम उपाय होय.
- बहुविध औषधोपचाराने कुष्ठरोग खात्रीने पूर्णपणे बरा होतो. कुठलीही शंका असल्यास डॉक्टरांकडून खात्री करून घ्या.

**कुष्ठरोगाच्या लवकर निदान व नियमित एम.डी.टी. औषधोपचाराने विकृती टाळता येतात.**

**सर्व सरकारी दवाखाने, प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र व कुष्ठकार्यातील सामाजिक संस्था यांच्या आरोग्य केंद्रातून बहुविध औषधोपचार (एम.डी.टी.) मोफत मिळतो.**

# लोकशिक्षणात प्रत्येकजण महत्त्वाचा...!

**कुष्ठरोगाची माहिती करून घेऊ, इतरांना देऊ, गैरसमज व भीती दूर सारू!**
















**आम्ही शिक्षक, विद्यार्थी! कुष्ठरोग जनजागरणात सहभागी होऊ!**
**समाजाचा कुष्ठरोगाकडे बघण्याचा दृष्टीकोन व व्यवहार निश्चित बदलू!**

आपल्यातले गैरसमज दूर करू, कुष्ठपीडिताला समाजात स्थान देवू.




लवकर निदान, नियमित उपचार, कुष्ठरोग होतो निश्चित पसार.